**-: प्रेसनोट दिनांक- ०९/०२/२०२३ :-**

**आरोपी लोकसेवक १) विठठल भावकू भोगण, वय - ५० वर्षे, ग्रामविकास अधिकारी, शिरोली पुलाची, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर वर्ग - ३, रा. प्लॅट नं.३०३, गंगाधाम अपार्टमेन्ट, गणेश मंदिराजवळ, जाधववाडी, कोल्हापूर मुळ रा. कोवाड, ता. चंदगड, जि.कोल्हापूर २) शामराव उर्फ भरत बापु परमाज, वय - ६० वर्षे, खाजगी इसम, रा. चौगुले गल्ली, शिरोली पुलाची, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत........**

---

तक्रारदार यांचे घराशेजारी चिकन विक्रीचे दुकान असुन सदर चिकन विक्रेत्याने त्यांचे दुकानासमोर रस्त्यावर अतिक्रमण केले आहे. सदर अतिक्रमणाचा तक्रारदार यांना त्रास होत असलेने सदरचे अतिक्रमण ग्रामपंचायत शिरोली पुलाची यांचेकडुन काढणेसाठी सदर ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी यांचे नावे अतिक्रमण काढणेबाबत दोन वेळा अर्ज दिला होता सदर अर्जावर कारवाई होणेबाबत तक्रारदार वारंवार ग्रामविकास अधिकारी श्री भोगण यांना भेटले परंतु त्यांनी तक्रारदार यांना काही प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर तक्रारदार यांना अतिक्रमण काढण्याचे असले तर ५०००/- रूपये द्यावे लागतील अशी मागणी आरोपी नंबर ०१ ग्रामविकास अधिकारी भोगण यांनी आरोपी नंबर ०२ एंजट परमाज यांचे मार्फतीने केली.

दिनांक ०९/०२/२०२३ रोजी तक्रारदार यांनी अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार अर्ज दिला. तक्रारीप्रमाणे दिनांक ०९/०२/२०२३ रोजी पडताळणी केली असता पडताळणीमध्ये आरोपी नंबर १ यांनी तक्रारदार यांचे अतिक्रमण वरील अर्जावर कारवाई करणेसाठी तक्रारदार यांचेकडे ५०००/- रूपयांची लाचेची मागणी करून तडजोडीअंती ४०००/- रूपयांची लाचेची मागणी करून सदरची रक्कम आरोपी नंबर ०२ यांचेकडे देणेस सांगीतली तसेच आरोपी नंबर ०२ यांनी सुध्दा आरोपी नंबर ०१ यांनी मागणी केलेप्रमाणे ४०००/- रूपये लाच रक्कम त्यांचेकडे स्विकारण्यास सहमती दर्शविल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लागलीच सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन खाजगी इसम आरोपी नंबर २ शामराव उर्फ भरत बापु परमाज यांनी ४०००/- रूपये लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडणेत आले आहे.

सदरबाबत **१) विठठल भावकू भोगण, वय - ५० वर्षे, ग्रामविकास अधिकारी, शिरोली पुलाची, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर वर्ग - ३, रा. प्लॅट नं.३०३, गंगाधाम अपार्टमेन्ट, गणेश मंदिराजवळ, जाधववाडी, कोल्हापूर मुळ रा. कोवाड, ता.चंदगड, जि.कोल्हापूर २) शामराव उर्फ भरत बापु परमाज, वय - ६० वर्षे, खाजगी इसम, रा. चौगुले गल्ली, शिरोली पुलाची, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर** यांचेविरूध्द शिरोली एमआयडीसी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची प्रकीया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. अमोल तांबे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, श्री नितीन कुंभार, पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, श्री संजीव बंबरगेकर, पोलीस उपनिरीक्षक, पो.हे.कॉ. विकास माने, पो.कॉ.मयुर देसाई, पो.कॉ. रूपेश माने चा.पो.हे.कॉ. विष्णु गुरव अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**
**२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**

**३) श्री.सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९६७३५०६५५५ कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**
**४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.**
**५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**